महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/मा.तं. दिनांक:-१२ फेब्रुवारी, २०२२

## -: प्रसिध्दीपत्रक:-

**विषय:- महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०१९ - सर्वसाधारण गुणवत्तायादी, पसंतीक्रम व भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या सुविधेबाबत.**
**संदर्भ:- जाहिरात/अधिसूचना क्रमांक १७/२०१९, दिनांक ३० सप्टेंबर, २०१९**

महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०१९ करीता सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. सदर सर्वसाधारण गुणवत्तायादी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून. उमेदवारांच्या अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी प्रमाणपत्र/कागदपत्रे यांची पुनर्पडताळणी करताना काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये बदल होऊ शकतो.

३. प्रस्तुत सर्वसाधारण गुणवत्ता यादी मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये दाखल विविध न्यायिक प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात येत आहे.

४. विषयांकित परीक्षेच्या मुलाखतीपूर्वी उमेदवारांकडून संवर्ग/ पदांचे पसंतीक्रम मागविण्यात आले होते. तथापि, अंतिम निकालासंबंधीच्या कार्यवाहीकरीता आयोगाकडून सुधारित कार्यपध्दतीचा स्वीकार केलेला असल्याने सर्व उमेदवारांनी संवर्ग/ पदांचे पसंतीक्रम पुन्हा नव्याने सादर करणे अनिवार्य आहे.

५. संवर्ग / पदांचे पसंतीक्रम अथवा भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प सादर करण्याकरीता आयोगाच्या https://mpsc.gov.in संकेतस्थळावरील ‘ONLINE FACILITIES’ या मेनूमध्ये ‘Post Preference /Opting Out’ वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंक दिनांक १२ फेब्रुवारी, २०२२ रोजी १५.०० वाजेपासून दिनांक २० फेब्रुवारी, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

६. पसंतीक्रम अथवा भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प यांच्या आधारे अंतिम निकाल / शिफारशी संदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल:-

(१) पसंतीक्रम सादर करणारे उमेदवार ज्या संवर्ग/ पदांकरिता पसंतीक्रम सादर करतील, केवळ त्याच संवर्ग / पदांवरील निवडीकरीता त्यांचा विचार करण्यात येईल.

(२) विहित कालावधीनंतर संवर्ग/ पदांचे पसंतीक्रम सादर करण्याची अथवा बदलण्याची उमेदवाराची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य केली जाणार नाही.

(३) भरतीप्रक्रियेमधून बाहेर पडण्याचा विकल्प निवडणाऱ्या उमेदवारांचा अंतिम शिफारशीकरीता विचार करण्यात येणार नाही.

७. संवर्ग/ पदांचे पसंतीक्रम/ बाहेर पडण्याचा विकल्प सादर करण्यात कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोलफ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग